स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

<u>प्रस्तावित</u>

संशोधन आराखडा (इतिहास)

Research Outine-History.

संशोधन शिर्षक

"मराठवाडयातील ऐतिहासिक तेर नगराचा चिकित्सक अभ्यास"

<u>संशोधक</u>

श्री. समीर दत्तात्रय जाधव (M.A.B.Ed)

(Shri Samir Dattatraya Jadhav)

मु.पो. धाराशिव, ता.जि. धाराशिव मो. 9175919506.

<u>मार्गदर्शक</u>

प्रा.डॉ. दामाजीवाले माधव दिगंबर

स्वामी विवेकानंद माहविदयालय, शिरूर (ता).

ता. अहमदपूर, जि. लातूर.मो. नं. 9420214720

“मराठवाड्यातील ऐतिहासिक तेर नगराचा चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना :

प्राचीन महाराष्ट्राच्या वैभवशाली सांस्कृतिक वाटचालीमध्ये मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील अनेक ठिकाणांचा गौरवपूर्ण उल्लेख करता येतो. विशेषतः तुळजापूरची आई भवानी, मैलारपूरचा खंडोबा, परंडा व नळदुर्गचा भुईकोट किल्ला, रामलिंगचे निसर्गरम्य देवालय, धाराशिव लेण्या, कुंथलगिरीचे देखणे जैन मंदिर आदींमुळे जिल्ह्याला जशी वेगळी ओळख मिळाली आहे; त्याचप्रमाणे २५०० वर्षांपूर्वीचा इतिहास आपल्या पोटात साठवणाऱ्या प्रगत प्राचीन नागरी संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या तेर मुळेही जगाच्या नकाशात धाराशिव जिल्ह्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

श्री क्षेत्र तेर म्हणजे पौराणिक प्रयोदर्शन आणि अर्वाचीन तेरणा नदीच्या काठावर वसलेले सुंदर असे प्राचीन गाव. पूर्वी हिंदू ,बौद्ध, जैन धर्मियांचे व शैव आणि वैष्णव पंथीयांच्या अनुयायांचे वसतीस्थान असणारे सर्वधर्मसहिष्णूतेची साक्ष देणारे हे गाव. ऐतिहासिक संदर्भानुसार तगरनगर, तेरापुर, तेर ,थेर अशा विविध नावांचा उल्लेख मिळतो. प्राचीन काळात नगरांना विशिष्ट नावाने संबोधले जात असे .तेथील नद्या व तेथे आढळणाऱ्या वनस्पती वरून नगराचे नाव निश्चित केले जात असे. तेर येथे तगरपुष्प म्हणजेच पांढरी फुले येथील लोक देवाला वाहत असत, या भागात तगर पुष्पांचे अधिक प्रमाण असल्याने तेरला तगर, तगरपूर ,तगरनगर हे नाव दिल्याचे दिसून येते. जैन मुनी कनकामराच्या ‘करकंडचरयू’ या जैन ग्रंथात तेरापुर नावाचा उल्लेख आहे. त्याच प्रमाणे तेरला थेरवादी भिक्षूंचे वास्तव्य असल्याने थेर असेही म्हटले जात असे. सध्याचे तेर हे नाव १४ व्या व १६ व्या शतकातील शिलालेखा वरून दिसून येते .तेर येथील पाटील घराण्याकडे तेर परिसरातील बारा वाड्यांचे वर्चस्व होते. त्यावरून बारा वाड्या व तेरावे तेर अशा रीतीने तेरची विविध नावे दिसून येतात. याशिवाय थिगर,थगर तसेच संस्कृत वाङ्मयात थगरम, कन्नड भाषेत तारीकाडू अशी अनेक नावे या नगराचा नामनिर्देश करतात.

अनेक कालखंडाची साक्षीदार राहिलेली ही भूमी एकेकाळी आंतरराष्ट्रीय व्यापारीकेंद्र ,कला-शिल्पनगरी व सातवाहनांची आर्थिक राजधानी म्हणून सुपरिचित होती. यावेळी या नगरास उपराजधानीचा दर्जाही होता. प्राचीन भारतातील सातवाहनाच्या कालखंडातील वैभवशाली नगरांच्या यादीत तगर-तेरला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ते एक धाराशिव जिल्ह्यातील प्राचीन वारसा लाभलेले वैभवशालीनगर म्हणून ओळखले जाते. तेरला २५०० वर्षाहून जुना इतिहास आहे. .उत्खननात सर्वात खालच्या थरात सापडलेले एक गुळगुळीत दगडी हत्यार नवाश्मयुगीन मानवाच्या अधिवासाचा पुरावाच होय. कुशानकालीन हस्तिदंती बाहुलीमुळे तेर जगाच्या नकाशावर आले. तेर मधील विविध काळात झालेल्या उत्खननातून, पुरातत्वीय ऐतिहासिक अवशेषांमधून तेरचे प्राचीनत्व दिसून येते. भारताच्या वैभवशाली संस्कृतीला ऐतिहासिक वारसा लाभला असून अनेक राजसत्तांची व प्राचीन नगरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तगरचा सर्वात प्राचीन उल्लेख अशोकाच्या सांची स्तूपावरील कोरीव लेखात 'ताकारपद' असा आढळतो. तसेच कलचुरी व तेर यांचा संबंध दर्शवणारा ही इसवी सन ११६३ सालचा विज्जन कलचुरीचा एक शिलालेखिय पुरावा तेर येथे सापडला आहे. तगरवर मौर्य, सातवाहन, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे कलचुरी, शिलाहार इत्यादी राजघराण्यांनी राज्य केल्याचे दिसून येते. पण तेरच्या व्यक्तिमत्त्वाचा खऱ्या अर्थाने अविष्कार करणारा सुवर्णकाळ म्हणजे सातवाहन काळ होय.

रोमन इतिहासकारांच्या मते तेर ही २००० वर्षांपूर्वी दक्षिणेतील सर्वात मोठी बाजारपेठ होती. तेव्हा या नगराचा विस्तार सुमारे सहा ते साडेसहा मैल होता. तेव्हा भडोच-थेर म्हणजे तगर ते उज्जयनी हा प्रमुख व्यापारी मार्ग होता, त्याच बरोबर अरबी समुद्र ते बंगालचा उपसागर यांना जोडणाऱ्या पूर्व-पश्चिम राजमार्गा वरील हे प्रमुख ठाणे होते.

'पेरीप्लस ऑफ दि एरिथ्रियनसी' या इसवी सन ५० ते १०३ या काळामध्ये एका अज्ञात ग्रीक खलाशाने लिहिलेल्या ग्रंथातील उल्लेखानुसार युरोप मधील रोम, इजिप्त व ग्रीस देशाशी इथले व्यापारी संबंध होते. याच बरोबर शक,कुशान व इराणी व्यापारी सुद्धा इथे येत असावेत, असे

या ठिकाणी सापडलेल्या कलावशेषांवरून स्पष्ट होते .पूर्व-पश्चिम राजमार्गावरील हे प्रमुख शहर असल्याने सुरुवातीला रोमन साम्राज्याशी होणारा व्यापार मसुलीपट्टणम, विणुकोंडा, भाग्यनगर, तगर, पैठण (प्रतिष्ठान) मार्गे भडोच येथून भूमध्य समुद्रामार्गे ग्रीक, रोमन साम्राज्य असा होता. नंतरच्या सातवाहन काळात व्यापाराची दिशा बदलली. क्षत्रपानी पश्चिम किनारपट्टी व्यापल्यामुळे विशाखापट्टणम .मसुलीपट्टणम मार्गे श्रीलंकेला वळसा घालून रोमन साम्राज्याकडे व काही माल अग्नेय आशिया कडे निर्यात होत असे. तेरच्या उत्खननातील अवशेषावरूनही या नगराचा आंध्रप्रदेशातील अमरावती व मसुलीपट्टणम बंदराशी संबंध असल्याचे संकेत मिळाले आहेत. तज्ञांच्या मते या ठिकाणाहून मातीची भांडी, शंखाच्या बांगड्या, शाडूच्या वस्तू, हस्तिदंती वस्तू व सुती, तलम कपडयांचा व्यापार व्हायचा. पैठणच्या रेशमी वस्त्राबरोबर तेरच्या सुती तलम वस्त्राने पाश्चात्त्य नगरास भुरळ घातली होती. हे अनेक पाश्चात्त्य लेखकांच्या त्यावेळी केलेल्या वर्णना वरून कळते.

एके काळी समृद्धीचे शिखर गाठलेल्या तगर या तेजस्वी नगराच्या स्थल निश्चिती विषयी पेरीप्लस व टॉलेमी या ग्रंथकारानी तगरचे स्थान पैठणच्या वेगवेगळ्या दिशेस असल्याचे निर्देश केल्यामुळे तज्ञांमध्ये उलटसुलट साधक बाधक चर्चा होती. विविध विद्वानांनी तगरनगरीचे गुढ स्पष्टकरण्याचा प्रयत्न केला. पुढे डॉक्टर फ्लिट यांनी आरंभी बॉम्बे गॅजेट इयर मध्ये तगर म्हणजे कोल्हापूर किंवा करवीर असे नवीन मत मांडले पण नंतर त्यांनी हे मत बदलून तगरचा तेरशी संबंध स्पष्ट केला. या वादास त्यांनी भाषाशास्त्रीय भौगोलिक आधार देऊन सध्याचे धाराशिव जिल्हयातील तेर हेच प्राचीन तगर होय असे सिद्ध केले. डॉक्टर बार्नेट यांनी ही हे मत ग्राह्य मानले. डॉक्टर फ्लिटच्या मताला प्राचीन अवशेषांचा प्रत्यक्ष पुरावा देण्याचे काम पुरातत्व खात्यातील अधिकारी मिस्टर हेनरी कझिन्स यांनी केले. कझिन्सच्या संशोधनामुळे स्थल निश्चिती विषयी असणाऱ्या सर्व शंकांचे निरसन झाले. त्याने १९०२-१९०३ यावर्षीच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याच्या वृत्तांता मध्ये तेर संबंधी सविस्तर विवेचन प्रसिद्ध केले. त्यामुळे आता पेरिप्लस व टॉलेमी यांनी उल्लेख केलेले

प्राचीन तगर म्हणजे सध्याचे तेर याबद्दल कोणाचे ही मनात दुमत राहिलेले नाही. प्राचीन तेरच्या वैभवाची साक्ष देणारे पुरावे घेऊन श्री रामलिंग अप्पा शासकीय पुराणवस्तू संग्रहालय तेर येथे दिमाखात उभे आहे. या संग्रहालयातील सुमारे २५ हजार वस्तू तेरच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात.

प्राचीन तेरचे धार्मिक प्रवाह बदलत्या काळानुसार बदलत गेले. तेर मध्ये सापडलेले स्तूप, चैत्यगृह ,अस्तित्वात असलेले जैन मंदिर, शैव वैष्णो पंथीय मंदिरे ही धार्मिकतेची साक्ष देतात. दाक्षिणात्य स्थापत्य शैलीचा प्रभाव असलेली मंदिरे ही तेर मध्ये पाहायला मिळतात .तेर मधील त्रिविक्रम मंदिर, उत्तरेश्वर मंदिर ,नरसिंह मंदिर ,कालेश्वर मंदिर, संत गोरोबा मठ इत्यादी प्रगत वास्तु शैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. प्राचीन बौद्ध चैत्याचे परिवर्तित रूप असलेल्या त्रिविक्रम देवालयाच्या वास्तूतून बौद्ध शिल्प स्थापत्याची अनेक वैशिष्ट्ये प्रतीत होतात. उत्तरेश्वर आणि कालेश्वर ही देवालये द्रविडी शिल्प स्थापत्याची उत्कृष्ट उदाहरणे होत. उत्तर व दक्षिणेच्या संयोगातून उगम पावलेली व गांधार शिल्प कलेसमान असणारी स्थापत्य कला तेरचा खास पैलू होय. चेझर्ला महाबलीपुरम घंटसाला, सांची, जगय्यपेठ, नागार्जुनी कोंडा व वेरूळ येथील स्थापत्य शैलीच्या खाणाखुणा तगर नगरीत आढळतात.

वैराग्यमेरू संत गोरोबा काकांनी तेर मध्ये वास्तव्य करून लोकांना समतेची ,ममतेची, भक्ती भावाची शिकवण दिली .आजही त्यांचा मठ तेर मध्ये असून त्यांचे राहते घरही पुरातत्त्व विभागाने मौलीक ठेवा म्हणून जतन केले आहे .प्राचीन नागरी वैभवशाली परंपरेचा वारसा जतन करून आपली वेगळी ओळख जतन करून ठेवणाऱ्या तेरचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन प्रसिद्ध इतिहासकार डॉ रा. श्री. मोरवंचीकर यांनी," पैठण दक्षिणेची काशी असेल, तर तगर दक्षिणेची मथुरा आहे." असे वर्णन केले आहे.यावरून धाराशिव जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या तेर नगरीचे महत्त्व अधोरेखित होते.

समस्या सूत्रण :

प्रस्तुत संशोधन अभ्यासात प्राचीन तेर नगरातील ऐतिहासिक घटना, घडामोडींचा संशोधन अभ्यास करताना तेर नगराबाबत विविध अभ्यासकांची मत-मतांतरे विचारात घेतली आहेत. त्याच प्रमाणे विविध कालखंडात तेर शहरातील राजकीय, सामाजिक, धार्मिक,सांस्कृतिक परस्थितीचा अभ्यास करताना पुढील विविध समस्यांच्या आधारे संशोधन अभ्यास करण्यावर भर दिला असून त्या संशोधन समस्या पुढीलप्रमाणे -

1. प्राचीन तेर नगराचा पूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापार उद्योग कसा चालत होता?
2. प्राचीन तेर नगरात कोण-कोणत्या राजकीय सत्तांचे वर्चस्व होते ?
3. तेर मधील विविध मंदिरे व स्तूप यांच्या बांधणीत कोणती स्थापत्यशैली दिसून येते?
4. वारकरी संप्रदायात संत गोरोबा कुंभार यांचे साहित्य व त्यांची कोणती शिकवण होती?
5. ऐतिहासिक तेर हीच तगर भूमी होती काय?
6. तेर येथे झालेल्या उत्खननातून कोणती ऐतिहासिक व पुरातत्वीय साधने सापडली?
7. प्राचीन तेर नगरातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक ,आर्थिक, राजकीय स्थिती कशी होती?

संशोधन अभ्यास विषयाची गृहितके :

प्रस्तुत संशोधन अभ्यास विषयाची आधारभूत गृहीतके म्हणून पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

1. प्राचीन तेर नगरात सहिष्णू वृत्तीच्या सातवाहन व इतर राजवटीत स्थापत्य शैलीचा सर्वोत्तम विकास झाला होता.
2. प्राचीन तेर नगरातून आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग व्यापार चालत होता.तेर व रोम संबंध दर्शवणारे अवशेष तेर येथे उपलब्ध आहेत.

3. संत गोरोबा काकांनी सामाजिक समता, सर्वधर्म समभाव व मानवतावादाची शिकवण दिली.

4. प्राचीन तेर नगराचा सर्वांगीण विकास सातवाहन काळात झाला.

5. सातवाहनांच्या काळात प्राचीन तेर नगरासाठी सुवर्णकाळ मानला जात असून याच काळात पुरातत्वीय समृद्ध वारसा लाभला होता.

6. तेर ही सातवाहनांची उपराजधानी व व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र होते. सांस्कृतिक क्षेत्रातही याच काळात विशेष प्रगती झाली.

7. दुसऱ्या शतकातील सातवाहन काळात तगर भूमीत बौद्ध धर्म उत्कर्षावस्थेत होता.

8. तेर हे तत्कालीन हीनयान बौद्ध धर्मीयांचे प्राचीन सुप्रसिद्ध केंद्र होते.

१०. सातवाहन काळातील राजे हे सहिष्णुवृत्तीचे असल्याने तेर येथे जैन, बौद्ध व हिंदू धर्माचे अस्तित्व दिसून येते.

संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे :

शास्त्रशुद्ध पद्धतीने संशोधन कार्य यशस्वी करण्यासाठी निश्चित उद्दिष्टे आवश्यक असतात..उद्दिष्टां शिवाय संशोधन कार्य परिपूर्ण होऊ शकत नाही. यास्तव संशोधन विषयानुसार पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१, प्राचीन तेर या नगराचा ऐतिहासिक आढावा घेणे .

२, तेर मधील विविध काळातील वास्तुकलेचा अभ्यास करणे.

३. तेर मधील विविध राजघराण्यांच्या ऐतिहासिक कारकिर्दीचा आढावा घेणे.

४. प्राचीन काळातील तेर हे आंतरराष्ट्रीय व्यापार व उद्योगाचे केंद्र याचा अभ्यास करणे.

५. तेर मधील संत गोरोबा काकांच्या विचार कार्याचा अभ्यास करणे.

६, तेर मधील विविध सांस्कृतिक परंपरांचा, लोकजीवनाचा अभ्यास करणे.

७. मराठवाड्याच्या सांस्कृतिक वैभवात तेर नगराची भूमिका अभ्यासणे.

संशोधन अध्ययनाची व्याप्ती, क्षेत्र, मर्यादा ::

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय मराठवाड्यातील ऐतिहासिक तेर नगराचा चिकित्सक अभ्यास असा निश्चित केला असून सदर संशोधनां मध्ये तेर नगराच्या निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेऊन येथील विविध राजकीय घराण्यांची सत्ता, धार्मिक स्थिती, वास्तू, शिल्पकला, लोकजीवन तसेच समाज जीवनाचा सांस्कृतिक दृष्टीने आढावा घेण्यात येणार आहे. सदर संशोधन हे सातवाहन पूर्व व सातवाहन कालीन तसेच सातवाहनोत्तर काळातील असून येथे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणाचे कलचुरी ,शिलाहार, यादव इत्यादी राजघराणी, मुस्लिम राजवट तसेच संत गोरोबा काकांच्या विचार कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे व शेवटी स्वातंत्र्योत्तर भारतातील तेर या अनुषंगाने संशोधन कार्य करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन हे धाराशिव जिल्ह्यातील प्राचीन तेर या नगरापूरते मर्यादित असणार आहे.

संशोधन अभ्यास पद्धती :

प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने ऐतिहासिक ,वर्णनात्मक, ग्रंथालयीन अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनात आवश्यक त्याठिकाणी विश्लेषणात्मक अध्ययन पद्धती वापरली आहे. तेर अध्ययनाचे एकक मानून प्राचीन काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत विविध राजकीय सत्ता, तेरचा विस्तार, स्थापत्यशैली, धार्मिक चळवळी, लोकजीवन, उद्योग ,व्यापार, जगाच्या नकाशावरील तेरचे स्थान इत्यादी घटकांचा तटस्थपणे अभ्यास करण्यात येणार आहे .तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे. प्राचीन काळातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, स्मारके ,पुरातत्व विभागा मार्फत केलेल्या उत्खननातून मिळालेल्या विविध ऐतिहासिक वस्तू ,मंदिरे ,शिल्प इत्यादी प्राथमिक साधनांच्या साह्याने अभ्यास केला जाणार आहे. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनाद्वारे तेर विषयी विविध लेखकांनी लिहिलेले संदर्भग्रंथ, शासनाच्या पुरातत्व विभागामार्फत प्रकाशित साहित्य, विविध शासकीय अहवाल, मासिके, वार्षिक अंक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय लेखकांनी

लिहिलेली तेर विषयाची माहिती तसेच मुलाखती, निरीक्षण, परीक्षणाद्वारे संशोधन कार्य करण्यात येणार आहे,.

संशोधन विषयाचे महत्त्व :

प्राचीन भारतीय इतिहास अभ्यासला तर असे दिसते की ,भारतात विविध प्रांतात प्रगत नागरी संस्कृती नांदत होत्या .उदारमतवादी सहिष्णू राजसत्ता ,त्यांचे सर्वधर्मसमभावत्वाचे धोरण, प्रगत लोकजीवन ,भरभराटीला आलेला व्यापार, उद्योग, प्रगत वास्तुशिल्पकला यामुळे समृद्ध, संपन्न आणि वैभवशाली नगरे येथे नांदत होती. प्राचीन काळात सुद्धा त्यांचा सर्वार्थाने विकास झालेला होता. कालौघात या नागरी संस्कृती नष्ट झाल्या ; पण त्यांचे अवशेष आजही सापडत आहेत. आणि त्या काळातील प्रगतीची ते साक्ष देत आहेत.

प्रस्तुत संशोधन विषयातून प्राचीन तेरच्या वैभवशाली इतिहासावर प्रकाश टाकून नव्या पिढीला याची जाणीव करून देणे हे या संशोधनाचे वैशिष्ट्य आहे. तेर विषयाचे विस्तृत प्रमाणात संशोधन झाल्यास तेरच्या प्राचीन विभागाचे विविध पैलू हाती येतील. तेरच्या दुर्लक्षित प्राचीन वैभवाचा, सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करून आधुनिक पिढीला जाणीव करून देता येईल . मराठवाड्यातील तेर नगराच्या स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामुळे विभागीय संशोधनाचे धागेदोरे मिळतील व मराठवाड्याचाही कालांतराने एकसंघ इतिहास उपलब्ध होईल. तत्कालीन आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आणि चिरंतन आर्थिक स्थैर्यामुळे तेर सामाजिक, सांस्कृतिक वैभवाच्या शिखरावर पोहोचले होते. या तेरचा/तगरचा काळाच्या ओघात झालेल्या प्रवासाचे टप्पे उलगडता येतील. तेरच्या त्याकाळातील प्रगतीमागे भौगोलिक पार्श्वभूमी काय होती? हे तपासून पाहता येईल. उत्खननात सापडलेल्या वस्तू म्हणजे अचूक माहितीचा ठेवा असतात; त्यांचा अधिक अभ्यास करण्याची संधी मिळेल. तेरच्या वैभवशाली प्राचीन संस्कृतीवर प्रकाश टाकणाऱ्या वाङ्मयाची अभ्यास करण्याची संधी मिळेल. कालौघात तेर मध्ये कोणकोणती ऐतिहासिक स्थित्यंतरे झाली हे अभ्यासता येईल. बदलत्या काळानुसार बदलत गेलेल्या प्राचीन तेरच्या धार्मिक

प्रवाहाचा अभ्यास करता येईल. याकाळातील तेरच्या समाजजीवनाची वैशिष्ट्ये अभ्यासता येतील. वैभवशाली तेर नगराच्या ऱ्हासाची कोणती कारणे आहेत याचा अभ्यास करता येईल.वरील सर्व संदर्भाने प्रस्तुत संशोधन विषयाचे खूप महत्त्व आहे.

प्रकरण निहाय संशोधनाचा आराखडा :

मानवी विद्याशाखेअंतर्गत संशोधन अभ्यासाचा विस्तृत आराखडा अत्यंत महत्त्वाचा असतो. निश्चित आराखड्यामुळे संशोधन कार्याला योग्य दिशा मिळते.सदर संशोधन कार्याच्या यशस्वीतेसाठी प्रस्तुत प्रबंधाची एकूण आठ प्रकरणात विभागणी केली आहे ती याप्रमाणे-

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत पहिल्या प्रकरणांमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने प्रास्ताविका घेऊन संशोधन समस्या, संशोधन अभ्यास विषयाची गृहितके, संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे, संशोधन अध्ययनाची व्याप्ती, क्षेत्र ,मर्यादा,संशोधनासाठी वापरण्यात आलेली अध्यापन पद्धती, दुय्यम व प्राथमिक साधनासह सदर संशोधन विषयाचे महत्त्व तसेच ऐतिहासिक तेर नगराबाबत विविध संशोधकांचे प्रबंध,विविध लेखकांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांचा, संशोधन पूर्ण साहित्याचा प्रकरण निहाय आढावा पहिल्या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : तेर मधील ऐतिहासिक पार्श्वभूमी : धार्मिक व सांस्कृतिक स्थिती

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात तेर मधील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला जाणारा असून सुरुवातीला धाराशिव आणि तेर तसेच मराठवाड्यातील सांस्कृतिक परंपरा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. तेर मधील प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक पार्श्वभूमीचा अभ्यास केला जाणार आहे.तसेच विविध राजकीय घराण्यांच्या कालखंडातील तेर मधील ऐतिहासिक व धार्मिक स्थितीचा आढावा घेतला जाणार असून या कालखंडात बौद्ध धर्म आणि तगरभूमी, जैन धर्म आणि तेरनगर, वारकरी संप्रदाय - हिंदू धर्म आणि तेर, तसेच तेर मधील विविध कालखंडात निर्माण करण्यात आलेली मंदिरे, स्तूप अशा ऐतिहासिक स्थापत्य शैलींचा, तसेच विविध सांस्कृतिक ऐतिहासिक घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : विविध कालखंडातील वेगवेगळ्या राजकीय सत्ता आणि तेर

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात तेर मधील विविध कालखंडातील विविध राजकीय घराण्याच्या सत्तांचा आढावा घेतला जाणार असून यात मौर्य काळ,सातवाहन पूर्व कालखंड, सातवाहन कालीन कालखंड, व सातवाहनोत्तर कालखंड या काळात सुवर्णभूमी म्हणून तेरचा झालेला आर्थिक, राजकीय, सामाजिक विकासाचा अभ्यास करण्यात येणार आहे. तेर मधील आयात-निर्यात,रोम,ग्रीस इ.देशांसोबतचा व्यापार, जनतेतील उद्योग व्यवसायाची कला व आवड, त्याचप्रमाणे तेर मधील शिलाहार, चालुक्य, यादव, विविध मुस्लिम राजवटी आणि स्वतंत्र भारतापर्यंतचा ऐतिहासिक तेर नगराचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : तेर-ऐतिहासिक लोकजीवनाचे विविध पैलू

प्रस्तुत चौथ्या प्रकरणात तेर मधील मौर्य काळापासून ते आधुनिक काळातील लोकजीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. विविध राजघराण्यांच्या कालखंडातील समाज व्यवस्था,तत्कालीन रूढी, परंपरा तसेच तेर मधील ऐतिहासिक स्त्री जीवन, जनतेची आहार विहार पद्धती, सण-उत्सव, विविध धार्मिक समारंभ याचा अभ्यास केला जाणार असून तेर मधील कला, साहित्य, शिक्षण अशा लोकजीवनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यात येणार आहे. आधुनिक कालखंडात भारत सरकारच्या पुरातत्व विभागामार्फत स्थापन केलेल्या रामलिंग आप्पा लामतुरे शासकीय पुराण वस्तू संग्रहालयातील ऐतिहासिक वस्तूंच्या विश्लेषणावर भर दिला जाणार आहे. यातून तत्कालीन तेर मधील विविध लोकजीवनाचे पैलू समोर येतील.

प्रकरण पाचवे : संत गोरोबाकाका आणि तेर

तेर च्या मध्ययुगीन काळातील विशेषतः यादवांच्या काळात वारकरी संप्रदायातील महान संत म्हणून संत गोरोबाकाका आणि तेर यांचा अभ्यास केला जाणार असून यात संत गोरोबा काकांचा जीवन परिचय,संत गोरोबांनी समाजाला दिलेली शिकवण,आचार, विचार,

धार्मिक, सहिष्णुवृत्ती यांचा अभ्यास केला जाणार असून त्यांच्या एकूण साहित्याचा, समाज उपदेशाचा अभ्यास करण्यावर भर देण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार निष्कर्ष व शिफारशी

प्राचीन तेर नगराचा विविध राजघराण्यांच्या कालखंडात झालेल्या विकासाचा म्हणजेच प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक तेर मधील आर्थिक,राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक घटकांच्या अभ्यासातून तसेच उपलब्ध तथ्य संकलनातून तटस्थपणे संशोधन अभ्यास केला जाणार असून शेवटी सहाव्या प्रकरणात संशोधकाला अभ्यासातून प्राप्त झालेले विविध निष्कर्ष व शिफारशींची मांडणी करण्यात येईल.

संदर्भसूची :

1. अग्निहोत्री द .ह.- महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान, पुणे १९७७ .
2. अग्रवाल वा. श. पाणिनीकालीन भारत वर्ष ,बनारस ,१९५५.
3. इनामदार एस. आर. महाराष्ट्रातील सातवाहन सत्ता आणि रोमन कालखंड, भारतीय इतिहास व संस्कृती, खंड ८ मुंबई १९६६.
4. कर्वे सि.जी. महाराष्ट्र परिचय ,पुणे १९५४.
5. कर्वे, इरावती- महाराष्ट्र -एक अभ्यास मुंबई १९७१.
6. काने पी. व्ही .भारत वर्षाचा प्राचीन भूगोल, मुंबई १९१८.
7. कुलकर्णी ज. बा. 'सत्यपुरी अथवा तेर महात्म्य'भारतीय इतिहास आणि संस्कृती, वर्ष ११ वे पुस्तक ४४ जानेवारी १९७५ .
8. कुलकर्णी राज- दक्षिणेची मथुरा तेर.
9. केतकर श्रीधर व्यंकटेश- 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' भाग १२ वा, पुणे ,१९२०.
10. खरात दीपक- तगर ते तेर.
11. खरात दीपक- वैराग्य महामेरू: संत श्री गोरोबाकाका.

12.खरे ग. ह. दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड २ रा .

13.खरे ग.ह. मूर्ती विज्ञान पुणे, १९३९ .

14.गजेंद्रगडकर भारत -बालाघाटची साद.

15.गोखले शोभना -पुरातत्व विद्या, कॉटिंन्स प्रकाशन,१९७७.

16.चित्राव सिद्धेश्वर शास्त्री- प्राचीन भारतीय स्थलकोष खंड १ ला, पुणे, १९६९.

17.जैन हिरालाल- 'भारतीय संस्कृती में जैन धर्म का योगदान' मध्य प्रदेश शासन साहित्य परिषद,भोपाळ १९६२.

18.जैन हिरालाल "करकण्डचरीऊ", कारंजा जैन सिरीज,वाराणसी,१९६४ .

19.जोगळेकर स.आ.-गाथासप्तशती ,पुणे १९५६.

20.जामवाडीकर सुलभा ,सुवर्णनगरी तेर, श्री लक्ष्मी प्रकाशन औरंगाबाद.

21.जोशी एस. बी. प्राचीन मराठी संस्कृती नागपूर, १९५२.

22.जोशी के. ए. कथासरीत्सागर (मराठी भाषांतर) पुणे, १९६२.

23.डिसकळकर द.बा. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, पुणे १९६४, .

24.ढवळीकर म.के.- प्राचीन भारतीय नाणकशास्त्र, पुणे.

25.ढेरे रा.ची. लज्जागौरी- पुणे ,१९७८.

26.तुळपुळे शं.भो. प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे १९६३.

27.दीक्षित मो.गं.- महाराष्ट्रातील काही शिलालेख व ताम्रपट पुणे १९४७. तेर वस्तूसंग्रहालयातील पुरातन वस्तूंचा परिचय, भारतीय इतिहास आणि संस्कृती ,वर्ष ९,१९७२ पुस्तक 33 ,मुंबई.

28.देव शांताराम भालचंद्र- महाराष्ट्रातील उत्खनने, दिल्ली ,१९६२ .

29.देव शांताराम भालचंद्र-'तेर', पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन पुरातन शोधनिबंध माला-१.

30.देशपांडे ब्रह्मानंद- देवगिरीचे यादव ,औरंगाबाद, १९७५.

31.धारूरकर वि.ल.' प्रतिष्ठान' सप्टें- ऑक्टो १९८०,वर्ष २८ वे अंक १ ला 'जेकेपूर येथील जैन अवशेष-एक पुरातत्वीय अभ्यास' .

32.पंडित महादेव शास्त्री जोशी- भारतीय संस्कृती कोश,पुणे, १९६५.

33.पाटील माया- मराठवाड्यातील मंदिरे व मूर्तीशिल्प.

34.पाठक अरुणचंद्र मराठवाडा एक शोध.

35.पाण्डेय चंद्रभान- आंध्र सातवाहन साम्राज्य का इतिहास, दिल्ली,१९६३.

36.पानसे एम.जी.-यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई ,१९६३.

37.पेंडसे शं.दा. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास.

38.भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक ,पुणे .

39.मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिकांक, पुणे 1974 . "प्राचीन तेर" (लेख) बी एन चापेकर.

40.मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक अंक, पुणे.

41.मिराशी वा.व.- सातवाहन, पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख, मुंबई ,१९७९ वाकाटकनृपती व त्यांचा काळ, नागपूर, १९५७.

42.राजगुरू श.ना.- महाराष्ट्र भौगोलिक आणि पुरातत्वीय पार्श्वभूमी, महाराष्ट्रातील पुरातत्व,पुणे १९७६.

43.रानडे प.वि.-पैठण चे सातवाहन राजकुल, औरंगाबाद.

44.रोडे सोमनाथ-मराठवाड्याचा इतिहास.

45.लामतुरे पुराणवस्तु संग्रहालय तेर -व्यक्तिगत निरीक्षण.

46.सहस्त्रबुद्धे पु.ग.- महाराष्ट्र संस्कृती,पुणे, 1979.

47.सांकलिया ह.धी. व माटे म.श्री.-महाराष्ट्रातील पुरातत्व, मुंबई ,१९७६ .

48.Cousens H,1902-03,Archaco logical Survey of India,Annual Report .

49.David R- Buddhist India ,London, 1930.

50. Douglas Barret -Ter.
51. Dwivedi V.P.-Indian Ivories 1976 .
52. Gazetteer of the Bombay Prsidency, Bombay .
53. Goswami -The Art Of Rashtrakutas,Calcutta,1958.
54. Hopkins E.W.The Religion of Indian, Boston, 1985.
55. Journal of Royal Asiatic Society, 1901,Bombay.
56. Marshall Taxashila,plate 136.
57. Morwanchiker R.S.-Paithan through the Ages,Thesis Aurangabad 1978 plate 8,9,A.
58. Osmanabad Gazetteer.
59. Puri B.N.- India in the time of Patanjali, Bombay, 1957.
60. Romilla Thaper - Ancient Indian Social history some interpretation, 1978.
61. Shoff W. H.-The Periplus of the Erithrian sea,London 1924.
62. Smith V.A.- Early history of India Oxford, 1924

संशोधक अध्ययनार्थी — **मार्गदर्शक**

समीर दत्तात्रय जाधव — **डॉ दामाजीवाले एम. डी.**